सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस अधीक्षक, लोहमार्ग पुणे कार्यालय
जुने सी.आय.डी. ऑफीस, संगम ब्रिज जवळ, शिवाजी नगर, पुणे ४११००५

जा.क्र./पोलीस निरीक्षक, जिविशा लो. पुणे/ ५१४६ /२०२४ पुणे दि. १९/१२/२०२४

**प्रेसनोट** दिनांक १९/१२/२०२४

**३८ वी लोहमार्ग पोलीस परिक्षेत्रीय क्रिडा स्पर्धा २०२४ राज्य राखिव पोलीस बल गट नं.०१ रामटेकडी, पुणे येथे संपन्न होत असलेबाबत.**

——ooo——

दिनांक २३/१२/२०२४ ते २७/१२/२०२४ या कालावधीत ३८ वी लोहमार्ग पोलीस परिक्षेत्रीय क्रिडा स्पर्धा राज्य राखिव पोलीस बल गट क्र. ०१ रामटेकडी, पुणे येथे होणार आहेत. सदर स्पर्धेमध्ये फुटबॉल/हॉकी/बास्केट बॉल (पुरूष/महिला) हॉलीबॉल (पुरूष/महिला), हॅन्डबॉल (पुरूष), कबड्डी (पुरूष/महिला), खो–खो (पुरूष/महिला), अॅथलेटिक्स (पुरूष/महिला), कुस्ती (पुरूष), क्रॉसकंट्री हे क्रिडा प्रकार होणार असून सदर स्पर्धेकरीता संपुर्ण महाराष्ट्रातून एकुण ४०० पोलीस खेळाडू सहभाग घेणार आहेत. सदर स्पर्धेचा उद्घाटन समारंभ दिनांक २३/१२/२०२४ रोजी १६:०० वा. पोलीस अधीक्षक, लोहमार्ग पुणे श्री. तुषार दोशी भा.पो.से. यांचे हस्ते होणार असून सदर क्रिडा स्पर्धेचा समारोप समारंभ दिनांक २७/१२/२०२४ रोजी १६:०० वा. होणार आहे. सदर समारोप समारंभ कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून अपर पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई मा. श्री. प्रविण साळुंके, भा.पो.से. यांचे शुभ हस्ते संपन्न होणार आहे.

तरी सदरची बातमी प्रसारीत करण्यास विनंती आहे.

सस्नेह !